महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ०३ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# केडीएमसी निवडणुकीत महायुतीचा वरचष्मा

## भाजप-शिवसेनेची बिनविरोध विजयाकडे वाटचाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता / दि.02 (वार्ताहर)

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीने वर्चस्व सिद्ध करत निवडणूक रणांगणात मोठी आघाडी घेतली आहे. मतदान होण्यापूर्वीच केडीएमसीतील तब्बल २० जागांवर युतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, यामुळे युतीची विजयी घौडदौड स्पष्टपणे दिसून येत आहे. यामध्ये भाजपाचे १४ उमेदवार तर शिवसेनेचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. विरोधकांकडून उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असून, युतीच्या संघटनात्मक ताकदीचे हे मोठे उदाहरण मानले जात आहे. महापालिकेतील सत्तास्थापनेच्या दृष्टीने हा निकाल अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, उर्वरित जागांवरील निवडणुकीतही युतीला याचा फायदा होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.**

---

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना-भाजप महायुतीने इतिहास घडवणारा राजकीय मास्टरस्ट्रोक खेळत निवडणूक रणांगणात मोठी आघाडी घेतली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या यशस्वी रणनीतीमुळे विरोधी पक्षांचे अनेक दिग्गज उमेदवार माघार घेण्यास भाग पडले असून, मतदान होण्यापूर्वीच महायुतीचे तब्बल २० उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. केडीएमसीच्या निवडणूक इतिहासात अशी विक्रमी कामगिरी यापूर्वी कधीही झालेली नव्हती.

गुरुवारी महायुतीच्या संयुक्त व्यूहरचनेतून ९ उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने दुपारी एक वाजल्यानंतर भाजप व त्यानंतर शिवसेनेचे आणखी उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे स्पष्ट झाले. आज एकूण ११ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने महायुतीने केडीएमसी निवडणुकीत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. महायुतीचे हे बिनविरोध उमेदवार कल्याण पूर्व, डोंबिवली पूर्व आणि डोंबिवली पश्चिमेतील पॅनलमधील आहेत. मात्र कल्याण पश्चिम भागातून कोणताही उमेदवार बिनविरोध निवडून आलेला नाही.

या घडामोडींमुळे केडीएमसीत महायुतीची स्थिती अधिक भक्कम झाली असून, उर्वरित प्रभागांतील निवडणूक लढतींसाठी शिवसेना-भाजप युतीला मोठे मनोबल मिळाले आहे. दरम्यान, आतापर्यंत महायुतीवर सातत्याने टीका करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसेसह प्रमुख विरोधी पक्षांच्या उमेदवारांनी माघार घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या घडामोडींमुळे केडीएमसी निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व अधिक ठळक झाले आहे.

**■ भाजपचे बिनविरोध निवडून आलेले उमेदवार**

१) रेखा चौधरी- १८ अ
२) रंजना पेणकर – २६ ब
३) आसावरी नवरे – २६ क
४) मंदा पाटील- २७ अ
५) ज्योती पाटील- २४ ब
६) मुकंद (विशू) पेडणेकर- २६ अ
७) महेश पाटील २७ ड
८) साई शेलार १९ क
९) दिपेश म्हात्रे- २३ अ
१०) जयेश म्हात्रे- २३ ड
११) हर्षदा भोईर- २३ क
१२) डॉ.सुनिता पाटील- १९ ब
१३) पूजा म्हात्रे- १९ अ
१४) रविना माळी- ३० अ

**■ शिवसेनेचे बिनविरोध निवडून आलेले उमेदवार**

1) रमेश म्हात्रे -24 अ
2) हर्षल राजेश मोरे -28 अ
3) वृषाली रणजीत जोशी -24 क
4) विश्वनाथ राणे – 24 ड
5) ज्योती राजन मराठे –28 ब
6) रेश्मा किरण निचळ –11 अ

## संपादकीय

### अखेर महापालिका लढतींचं चित्र स्पष्ट !

महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपल्यानंतर आता निवडणूक रिंगणातील लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यानुसार कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेत वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची एकूण संख्या ६९५ होती. यापैकी २०५ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली असून, अखेर ४९० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अनेक प्रभागांत उमेदवारांना प्रतिस्पर्धी न उरल्याने बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. काही ठिकाणी सुरुवातीपासूनच एकमेव अर्ज आल्याने, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्याने उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. लोकशाहीत निवडणूक म्हणजे मतदारांना पर्याय देणारी प्रक्रिया. मात्र बिनविरोध निवडी वाढत असतील, तर त्यामागची कारणे गांभीर्याने तपासण्याची गरज निर्माण होते. राजकीय दबाव, खर्चाची भीती, संघटनात्मक कमकुवतपणा किंवा स्थानिक पातळीवरील सत्तासमीकरणे या सगळ्यांचा परिणाम निवडणूक प्रक्रियेवर होताना दिसतो. उमेदवार बिनविरोध निवडून येणे कायदेशीर असले, तरी लोकशाहीच्या आरोग्यासाठी ते नेहमीच पोषक ठरते असे नाही. मतदारांना मतदानाची संधीच न मिळणे, ही बाब लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर प्रश्न उपस्थित करणारी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांचा थेट सहभाग अपेक्षित असताना, स्पर्धेअभावी तो मर्यादित राहतो. असो, उद्या निवडणूक चिन्हांचे वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. त्यानंतर उरलेल्या प्रभागांत प्रत्यक्ष निवडणूक लढतींना रंग चढेल. मात्र बिनविरोध निवडींची वाढती संख्या ही केवळ आकड्यांची बाब न मानता, लोकशाही प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या दृष्टीने आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित करते. पालिका निवडणुका या स्थानिक प्रश्नांवर आधारित असाव्यात त्यासाठी सक्षम उमेदवार पुढे येणे, खुली व निर्भय स्पर्धा होणे आणि मतदारांचा सहभाग वाढणे, हाच लोकशाहीचा खरा उत्सव ठरेल.




## महत्वाचे

### बुलेट ट्रेनचा महाराष्ट्रात दुसरा बोगदा पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन च्या माध्यमातून मध्यमवर्गीयांना परवडणाऱ्या दरात प्रवास करण्याची सुविधा मिळेल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. बुलेट ट्रेनसाठीच्या महाराष्ट्रातल्या दुसऱ्या बोगद्याच्या पालघर जिल्ह्यातल्या ब्रेकथ्रू समारंभाला ते आज दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. हा दीड किलोमीटर लांबीचा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान खोदला आहे. महाराष्ट्रातला पहिला बोगदा ठाणे ते बीकेसी दरम्यान असून तो ५ किलोमीटर लांबीचा आहे. या बोगद्याचं खोदकाम सप्टेंबर २०२५ मध्ये पूर्ण झालं होत. मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प ५०८ किलोमीटर लांबीचा असून बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा १५ ऑगस्ट २०२७ रोजी सेवेत रुजू होईल असं ते म्हणाले.

### डोंबिवली : गोळवली रस्त्यावर स्टंटचा थरार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवली जवळील गोळवली गाव हद्दीतील विको नाका ते रिजन्सी अनंतम या प्रशस्त रस्त्यावर गुरूवारी रात्री स्पोर्टस बाईकच्या माध्यमातून स्टंटबाजी करताना एका दुचाकी स्वाराचा तोल जाऊन दुचाकीने रस्त्याच्या बाजुला असलेल्या एका मोटारीला जोराची धडक दिली. या धडकेनंतर दुचाकी स्वार वेगाने रस्त्यावर दुचाकीसह घरंगळत जाऊन गंभीर जखमी झाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

डोंबिवलीतील माणकोली उड्डाण पूल, ठाकुर्ली कचोरे भागातील ९० फुटी रस्ता, एमआयडीसीतील रस्त्यांवर डोंबिवली शहर परिसरातील स्पोर्ट्स बाईक स्वार रात्री १२ ते पहाटे चार वाजेपर्यंत विविध प्रकारच्या कसरती करत सुसाट वेगाने कर्णकर्कश आवाज करत दुचाकी चालवित असतात. या आवाजामुळे गाढ झोपेत असलेल्या नागरिकांना खूप त्रास होत आहे. कसरत पध्दतीने दुचाकी चालविणारे हे दुचाकी स्वार व्यायामपटू आणि दांडगाई करणारे असल्याने कोणी नागरिक त्यांना दुचाकी हळू चालवा म्हणून सांगण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. "रोज मध्यरात्रीनंतर स्पोर्ट्स बाईकचे कर्णकर्कश आवाज येतात. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना झोप लागत नाही. पोलिसांनी तातडीने कारवाई करावी." अशी मागणी स्थानिक रहिवासी करत आहेत.

## तेजश्री करंजुले यांनी स्वीकारला अंबरनाथ नगराध्यक्षपदाचा कार्यभार




दै. ठाणे जीवनदीप वार्ता/ दि.2

**अंबरनाथ :** "ना खाऊंगी ना खाने दूंगी, जो खाया उसका हिसाब लुंगी" असा ठाम संदेश देत प्रचार करणाऱ्या भाजपच्या तेजश्री करंजुले यांनी शुक्रवारी सकाळी अंबरनाथ नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. शिंदेंच्या शिवसेनेच्या माजी नगराध्यक्षा मनिषा वाळेकर यांचा पराभव करत करंजुले यांनी नगराध्यक्षपदावर विजय मिळवला होता. कार्यभार स्वीकारल्यानंतर नगर परिषदेच्या मुख्यालयाबाहेर घेतलेल्या छोटेखानी भाषणात करंजुले यांनी आपल्या प्राधान्यक्रमांची माहिती दिली. "शहरात आतापर्यंत अनेक कामे झाली, जी झाली ती झाली; मात्र आता यापुढे दर्जेदार, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख कामे झाली पाहिजेत," अशा स्पष्ट सूचना त्यांनी विविध विकासकामांच्या कंत्राटदारांना दिल्या. सभागृहात सर्व घटकांचा सन्मान राखत कारभार केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांना वेग देण्याचा निर्धार करंजुले यांनी व्यक्त केला. अंबरनाथ नगर परिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या उभारणीत शिंदेंच्या शिवसेनेतील माजी नगरसेवक, स्थानिक आमदार आणि खासदारांचा मोठा वाटा असला, तरी नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव झाल्याने अनेक ज्येष्ठ माजी नगरसेवकांचे स्वप्न अपूर्ण राहिले. अशा परिस्थितीत जनतेने भाजपच्या तेजश्री करंजुले यांना नगराध्यक्षपदी संधी दिली. नव्या प्रशासकीय इमारतीतील नगराध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसण्याचा पहिला मान तेजश्री करंजुले यांना मिळाला. त्यांनी प्रशासक व मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी भाजपचे आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, नेत्या चित्रा वाघ, माजी नगराध्यक्ष गुलाबवार करंजुले यांच्यासह भाजपचे नगरसेवक आणि पराभूत उमेदवार उपस्थित होते.



## मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ देणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### ९९ व्या मराठी साहित्य संमेलनाचा साताऱ्यात भव्य शुभारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठी भाषा आणि जाती धर्म यांची सरमिसळ न करण्याचं आवाहन संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी आज केलं. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या औपचारिक उद्घाटनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं आज उद्घाटन झालं. संमेलनाच्या अध्यक्ष पदाची सूत्रं ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी मावळत्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्याकडून स्वीकारली. ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग प्रमुख पाहुण्या होत्या.

सर्वात पहिल्यांदा मराठीत दलित साहित्य लिहिण्यात आले. दलित साहित्य हा मराठी साहित्यविश्वाचा आत्मा असल्याची भावना त्यांनी उद्घाटनपर भाषणात व्यक्त केली. ग्रामीण भागातल्या प्रकाशक आणि लेखकांना प्रोत्साहन देण्याची भूमिका मावळत्या अध्यक्ष डॉ. भवाळकर यांनी मांडली. पहिलीपासून हिंदी किंवा अन्य भारतीय भाषा शिकवण्याच्या निर्णयाला साहित्यिक जगताचा विरोध असल्याचंही त्या म्हणाल्या. साहित्य महामंडळाचे सचिव मिलिंद जोशी यांनी त्याला दुजोरा दिला.

मुख्यमंत्री असताना मराठी साहित्य क्षेत्रात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन दिली. साहित्यिकांनी राजकारणात यावे; मात्र साहित्य क्षेत्रात राजकारण आणू नये, असं ते म्हणाले. साहित्य जनजीवनाचं दर्शन घडवतं आणि समाजाला वळण लावतं. त्यामुळे संमेलनाच्या मंचावरुन झालेली टीका महत्त्वाची असं त्यांनी सांगितलं.

राज्यात केवळ मराठी भाषाच सक्तीची राहील, हिंदी किंवा इतर भाषा शाळेत शिकवण्याबाबत नरेंद्र जाधव समितीच्या अहवालानंतरच निर्णय घेऊ असं ते म्हणाले.



## भिवंडीत भाजपची विजयी घोडदौड सहा उमेदवार बिनविरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी/दि.2 :** भिवंडी महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून येण्याची घटना समोर आली आहे.विशेष म्हणजे हे सहा ही विजयी उमेदवार हे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार असल्याने भिवंडीत भाजपाची विजयी घौडदौड जोमात सुरू झाली आहे.विजयी उमेदवारांमध्ये एका अल्पसंख्यक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे.भाजप भिवंडीत जोरदार मुसंडी मारल्याने शिवसेना, काँग्रेस समाजवादी पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काही प्रमाणात तणावपूर्ण शांतता पसरली आहे.तर भाजप कार्यकर्ते जल्लोष व्यक्त करीत आहे.

भिवंडी महापालिकेत अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे बिनविरोध विजयी झाल्याचा आनंद साजरा होत असतानाच. आज शेवटच्या दुसऱ्या दिवशी भिवंडीत आमदार महेश चौघुले यांच्या मेहनतीने पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष व्यक्त केला महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी सन्नी फुटाणकर,प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा दीपक मढवी,प्रभाग क्रमांक १८ क - अबूसूद अशफाक अहमद शेख,प्रभाग क्रमांक १६ अ - परेश ( राजू ) चौघुले,प्रभाग क्रमांक 23 ब - भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले आहेत.भाजपाने अनपेक्षित पणे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आणल्यामुळे शिवसेना काँग्रेस समाजवादी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह अन्य पक्षांना मोठी चपराक बसली आहे. हा विजय भाजपाच्या विकासाच्या कार्याचा विजय असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली शहरातील जनतेला विकास भाजपा पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झाल्याने मुस्लिम बाहुल्य प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यशस्वी झालो आहोत अशी प्रतिक्रिया आमदार महेश चौघुले यांनी दिली.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केळकर–भोईर भेट

### राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यात एकमेकांचे कडवे विरोधक असलेले शिंदे सेनेचे माजी नगरसेवक संजय भोईर यांनी कुटुंबासह भाजप आमदार संजय केळकर यांची भेट घेतली. भोईर कुटुंबातील चारजण एकाच प्रभागातून निवडणूक लढवीत असून याच प्रभागात केळकर समर्थक भोईर कुटुंबियांविरोधात दंड थोपटून उभे आहेत.

त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट राजकीय दृष्ट्या महत्वाची मानली जात असून यानिमित्ताने दोन कडवे राजकीय विरोधक एकत्र आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. ठाणे शहर विधानसभा मतदार संघातील भाजपचे आमदार संजय केळकर आणि शिंदे सेनेचे माजी नगरसेवक संजय भोईर हे एकमेकांचे कडवे विरोध म्हणून ओळखले जातात. विधानसभा निवडणुकीत भोईर यांनी केळकर यांच्याविरोधात निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर त्यांनी निर्णय मागे घेतला होता. यानंतरही शिंदे सेनेचे संजय भोईर हे प्रचारापासून दूर असल्याने महायुतीची डोकेदुखी वाढली होती. केळकर यांनी भोईर यांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. निवडणुकीच्या अखेरच्या क्षणी दोन्ही नेत्यांमध्ये मनोमिलन झाल्याचे चित्र होते.



## उल्हासनगर पोलिसांची कारवाई गावठी कट्ट्यासह दोघांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर / ता. २ (वार्ताहर)**

ऐन महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर शहरात दोन वेगवेगळया ठिकाणी झालेल्या कारवाईत विठ्ठलवाडी व मध्यवर्ती पोलिसांनी दोघांना दोन गावठी कट्ट्यासह अटक केली. या घटनांमुळे निवडणुकीदरम्यान घातपाताची शक्यता तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित झाला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पहिली कारवाई कॅम्प 4 येथील सुभाष टेकडी परिसरात करण्यात आली. विठ्ठलवाडी पोलीस पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत सर्टिफाईड स्कूलच्या मैदानात एक संशयित व्यक्ती असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या व्यक्तीस ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्टल आढळून आले. अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव सोनू प्रकाश ठाकूर असे असून तो शहाड फाटक परिसरात राहत आहे. त्याच्याविरोधात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या घटनेत मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत सी-ब्लॉक रोडवरील सेंचुरी मैदान परिसरात एक इसम गावठी कट्टा घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार रात्री सुमारे 11 वाजता पोलिसांनी सापळा रचून एका संशयितास अटक केली. अंगझडती दरम्यान त्याच्याकडे एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतूस सापडले. अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव मोहम्मद फारूक हरून अन्सारी असून तो भिवंडी येथे राहणारा आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ शनिवार
०३ जानेवारी २०२६

# मत, नेता आणि लोकशाही



लोकशाही म्हणजे फक्त सत्तेचा खेळ नाही,
ती जनतेच्या श्वासात मिसळलेली एक जाणीव आहे.
नेते येतात, जातात, बदलतात मुखवटे,
पण मतदारच ठरवतो इतिहासाचे पान कोणते.

मंचावर नेते, हातात माईक आणि स्वप्नांची यादी,
काहींच्या नजरेत सेवा, काहींच्या मनात फक्त गादी.
शब्दांच्या गर्दीत हरवतो कधी खरा अर्थ,
मग मतदार विचारतो—“माझ्या प्रश्नांचं काय?”

मतदान म्हणजे शांत बंड, न दिसणारी तलवार,
एक बटण दाबून बदलतो सत्तेचा दरबार.
न मांडलेली भाषा, पण परिणाम प्रखर,
मतदार जागा झाला की नेते होतात खबर.

जर मत नसेल तर आवाजही थकतो,
उपेक्षेच्या सावलीत लोकशाही झुकतो.
म्हणून विचारपूर्वक टाका मताचा ठसा,
तोच ठरवतो उद्याचा नेता आणि देशाचा श्वास.

# स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार सावित्रीबाई फुले



पुरुषप्रधान समाज व्यवस्थेच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी फुले दांपत्याने जी क्रांतिकारक कामगिरी केली आहे,त्याचं शब्दात वर्णन करणं अवघड आहे.१५० वर्षांपूर्वी स्त्री- पुरुष समानता अन् सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी महात्मा फुले अन् सावित्रीबाई फुले यांनी संयुक्तरित्या तत्कालिन रूढीप्रिय अन् मनुवादी समाज व्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले. त्याकाळी स्त्रियांना चूल अन् मूल या चौकटीत जीवन कंठावे लागायचे.मनुस्मृतीच्या आधारे उभारलेल्या वर्णव्यवस्थेत स्त्रीजातीला हिन अशी दुय्यम दर्जाची वागणूक दिला जाऊन त्यांना शारीरिक उपभोगाची वस्तू म्हणून अमानुष वागणूक दिली जात असे.तसेच स्त्रियांना शिक्षण घेण्यास पूर्णतः मज्जाव असायचा.परिणामस्वरूप स्त्रिया ह्या तत्कालिन समाजात सामाजिक गुलामगिरीच्या बेड्यांमध्ये जखडल्या गेल्या होत्या.जणू काही त्यांचा कोणी वालीच नव्हता.त्यांचे जीवन पूर्णतः असुरक्षित व निराधार झालं होतं.अशात फुले दाम्पत्याचा उदय झाला,अन् जणू काही स्त्री जातीचा पालनहार पृथ्वीतळावर प्रगट होऊन स्त्रियांना शिक्षणाची कवाडं उघडणारे देवदूत भारतभूमीवर अवतरले.स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांना जयंती दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली!

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांना शिक्षित करून त्यांना स्वयंनिर्भर करणाऱ्या वंदनीय सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्याच्या खंडाळा तालुक्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे-पाटील यांच्या इमानदार घराण्यात झाला,अन् जणू काही स्त्री शिक्षणाची दिव्यज्योती प्रकाशित झाली.

स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाकरिता विद्येची ज्योत पेटविण्यासाठी पुढाकार घेऊन त्यांची पुरुषप्रधान समाजाच्या मगरमिठीतुन सुटका केली.दि.१ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडेंच्या वाड्यात स्त्रीयांच्या शाळेची मुहूर्तमेढ करून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याची जणू ही नांदीच ठरली.

स्त्री शिक्षणाची बिजे रोवल्याने तथाकथित कर्मकांडी पंडितांचा राग अनावरण झाला.त्यांनी शाळेत येत जातांना सावित्रीबाई फुले यांच्यावर अमानुष अत्याचार केला.त्यांच्या अंगावर कधी शेणाचं पाणी तर,कधी दगडांचा वर्षाव केला. एके प्रसंगी तर सावित्रीबाईंचे दगड लागल्याने डोकंच फुटलं होतं.बऱ्याच वेळा असभ्य शब्दांनी सावित्रीबाईंना हिणवले जायायचे..एवढं घडूनही सावित्रीबाई ह्या आपल्या ध्येयापासून हटल्या नाहीत.त्यांनी न डगमगता आपली स्त्री शिक्षणाची मोहीम पुढे पूर्णक्षमतेने सुरूच ठेवली.वास्तविक पहाता,सावित्रीबाई फुले ह्या भारतातल्या पहिल्या शिक्षिका ठरल्या असून,त्यांनी सुरू केलेली भिडेंच्या वाड्यातील शाळा ही देशातील पहिली मुलींची शाळा म्हणून नावरूपाला आली.यास्तव सावित्रीबाई फुले यांना मराठी जनमानसाचा मानाचा मुजरा!

आज सावित्रीच्या लेकी शिकूनसवरून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून विविध क्षेत्रात आघाडी घेताहेत.ही खऱ्या अर्थाने फुले दाम्पत्याचीच पुण्याई म्हणावी.थोर समाजसेविका वंदनीय सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या स्त्री शिक्षणातील महान कामगिरीला नतमस्तक होत,तत्कालीन राज्य सरकारने पुणे विद्यापीठाचे नामांतर करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे केले. वास्तविक पहाता,हीच खरी त्यांच्या महनीय कार्याची पावती होय.

शिक्षणाची महती-उपयुक्तता सांगताना सावित्रीबाई फुले म्हणतात,शिक्षणाने मनुष्यत्व येते.पशुत्व हरते पहा!विद्या हे धन आहे रे... श्रेष्ठ साऱ्या धनाहून,तिचा साठा जया पाशी,तो ज्ञानी मानिती जना! विद्या हे सर्वश्रेष्ठ धन असून,ज्याच्यापाशी हे धन आहे,तो समाजात ज्ञानी म्हटला जातो,असा उपदेश सावित्रीबाईंनी समाजातील स्त्रियांना दिला.

जिच्या हाती पाळण्याची दोरी,ती जगाते उद्धारी ही उक्ती फुले दांपत्याने स्त्रियांच्या दारी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवून स्त्री स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले.महात्मा फुले यांच्या निधनानंतर स्त्रियांना समाजात न्याय मिळावा,या उद्देशाने स्रीशिक्षण,स्त्री मुक्ती,स्त्री-पुरुष समानता यावर सावित्रीबाईंनी अधिक भर देऊन ज्योतिबा फुले यांचे सामाजिक समतेचं कार्य पुढे अविरत चालूच ठेवले.

सावित्रीबाईंनी बाल विवाह,विधवा स्त्रियांचे केशवपन,बालहत्या करणं, हुंडापद्धती,जातीभेद,वर्णभेद या कुप्रथांना कडाडून विरोध केला,तर स्त्री शिक्षण,विधवा पुनर्विवाह यांना प्रोत्साहित केले.निरक्षरता अन् गरिबी ही सामाजिक व बौद्धिक गुलामगिरीची दोन मुख्य कारणे असल्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेण्यास पुढे यावे.शिकल्याने माणूस हुशार व विवेकी होऊन,त्याला चांगलं काय अन् वाईट काय,याची चांगल्याप्रकारे कल्पना येते.तसेच त्याला आपल्या हक्कांची जाणीव होते.या पार्श्वभूमीवर स्त्रियांनी शिक्षण घेण्यास स्वयंस्फूर्तीने पुढे यावे.अन् आपल्या कुटुंबाच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासात आपलं योगदान द्यावं,म्हणजे हीच खरी सावित्रीबाईंना मानवंदना ठरेल.

**- पत्रकार रणवीर राजपूत,ठाणे/नंदुरबार**
**निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र शासन**

# सिद्धगड येथे हुतात्म्यांना आदरांजली

## रात्रभर देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : हुतात्मा वीर भाई कोतवाल व हुतात्मा वीर हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त तालुक्यातील सिद्धगड येथे शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली भीमाशंकर अभयारण्याच्या जंगलात असलेल्या निर्जन ठिकाणी या निमित्त रात्रभर देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते शुक्रवारी दोन जानेवारी रोजी सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी आमदार किसन कथोरे व माजी आमदार गोटीराम भाऊ पवार यांच्या हस्ते हुतात्मा ज्योत प्रज्वलित करून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली

भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश उर्फ बाळया मामा म्हात्रे व मुरबाड नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे यांनी एक जानेवारीच्या रात्री सिद्धगड येथे उपस्थित होते हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दोन जानेवारीच्या सकाळी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रमोद हिंदुराव , ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष दादा पवार , रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आचल दलाल , उल्हासनगर प्रांत अधिकारी , मुरबाडचे तहसीलदार अभिजीत देशमुख , गटविकास अधिकारी लता गायकवाड यांचे सह मोठ्या संख्येने नागरिक हजर होते

एक जानेवारीच्या सायंकाळी सात वाजता सिद्धगड येथे कार्यक्रमाचे उद्घाटन मुरबाडचे महसूल नायब तहसीलदार अमोल शिंदे , भीमाशंकर अभयारण्याच्या वन परिक्षेत्र अधिकारी श्रीमती



कोमल गद्रे यांनी केले रात्रभर देशभक्तीपर कार्यक्रमासह विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व व समूहगीत स्पर्धा , सिद्धगडचा रणसंग्राम ही नाटिका व शिवकालीन मर्दानी खेळ यामुळे वातावरण देशभक्ती मय झाले होते

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबियांचा सिद्धगड स्मारक समितीतर्फे सत्कार करण्यात आला तसेच विविध स्पर्धा मध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी ठाणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन सिंह पवार , राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते चंद्रकांत बॉस्टे मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दीपक खाटेघरे , खरेदी विक्री संघाचे प्रशासकीय अध्यक्ष संतोष पवार , शिवसेना नेते कांतीलाल कंटे , सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजय कोरडे तसेच स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत माळी योगेंद्र बांगर महेंद्र पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले

# खेळातून प्रेरणा मिळते

## हार मानायची नाही – राकेश तोमर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : खेळातून प्रेरणा मिळते. हार-जीत हे जीवनाचे भाग आहेत, मात्र हार मानता कामा नये. खेळातून शिस्त, संघभावना, मैत्री आणि एकतेची शिकवण मिळते. संघातील दुर्बल सहकाऱ्याला पुढे नेणे हीच खरी क्रीडाभावना आहे. असे पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांनी सांगितले.

श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालय, इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे यांच्या वतीने आयोजित शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धा दि. 27 ते 30 डिसेंबर 2025 या कालावधीत रूपादेवी मैदान, इंदिरानगर, ठाणे येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या. या क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध मैदानी खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली क्रीडागुणवत्ता सादर केली. क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभ श्री विभूती प्रकाशानंदजी विद्यालयाचे मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे करण्यात आला.

या क्रीडा स्पर्धांमध्ये धावणे, कबड्डी, खो-खो स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. तीन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धांदरम्यान विद्यार्थ्यांनी खेळाडूवृत्ती, शिस्त आणि संघभावना यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले. यावेळी सर्व शिक्षक व क्रीडा मार्गदर्शक यांनी नियोजनबद्ध पद्धतीने स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. समारोप व पारितोषिक वितरण सोहळ्यात विजेत्या व उपविजेत्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक कुँवर राकेश गंभीर सिंह तोमर यांचे हस्ते मेडल व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. शिक्षक अर्जुन चेमटे यांनी केले.

# सत्ता आली तरी विकासासोबत पर्यावरण संवर्धन गरजेचे

## – पुष्पा रत्नपारखी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : महाराष्ट्रात सध्या सर्वत्र निवडणुकांची धामधूम सुरू असून १६ तारखेला निकाल जाहीर होणार आहे. निकालानंतर सत्तास्थापना होईल आणि विकासकामांना वेग येईल. मात्र विकासासोबतच पर्यावरण जपणे ही आजची अत्यंत महत्त्वाची व काळाची गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्या व जागतिक पर्यावरण संस्थेच्या विभाग प्रमुख, वालधुनी नदी स्वच्छता संघर्ष समितीच्या अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी कल्याण शहर उपाध्यक्ष, पुष्पा रत्नपारखी यांनी व्यक्त केले आहे.

त्या म्हणाल्या की, प्रत्येक लोकप्रतिनिधीने आपल्या प्रभागातून किंवा मतदारसंघातून वाहणाऱ्या नद्यांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. अनेक ठिकाणी नद्या प्रदूषित झालेल्या असून त्यांचा परिणाम थेट नागरिकांच्या आरोग्यावर व भूजल पातळीवर होत आहे. त्यामुळे नदी स्वच्छता अभियान राबवणे हे केवळ जबाबदारी नव्हे तर आवश्यक कर्तव्य आहे. तसेच ज्या भागात झाडे, वनक्षेत्र किंवा हरित पट्टा आहे, त्या ठिकाणी वृक्षसंवर्धन व वृक्षारोपणाला प्राधान्य दिले पाहिजे. झाडांची उपासना व जपणूक केली तरच पर्यावरणाचा समतोल राखता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

सत्ता येते आणि जाते, पण निसर्ग जपला गेला तरच पुढील पिढीसाठी सुरक्षित भविष्य निर्माण होईल. त्यामुळे आगामी काळात विकासकामांबरोबरच पर्यावरण संवर्धन हे प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या अजेंड्यावर असले पाहिजे, असे आवाहन पुष्पा रत्नपारखी यांनी केले आहे.

# पथनाट्यातून मतदानाचा जागर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : वऱ्हाळदेवी तलाव परिसरात पालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या उपस्थितीत पथनाट्य सादर करत मतदान जनजागृती करण्यात आली, तर अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांच्या रॅलीचा प्रारंभही यावेळी सागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मतदानाचा हक्क बजावण्याबाबत शपथ दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी सहभागी झाले होते.

# भिवंडी : आचारसंहिता पथकाने वाहन तपासणीत ४ लाखांची रोकड जप्त

## सदर रक्कम पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे पडघम व प्रचार जोमामध्ये वाहू लागले असून निवडणूक यंत्रणा व अधिकारी कर्मचारी सतर्क होऊन काम करत आहेत मतदारांना विविध प्रकारचे प्रलोभन त्याचबरोबर छुप्या मार्गाने अर्थकारणाचे व्युहरचना सुध्दा सुरू झाल्याने महापालिकेचे आचारसंहिता पथक सतर्क झाली आहे.असे असतानाच महानगर पालिकेच्या निवडणूक आदर्श आचारसंहिता भरारी पथकाने (Flying Squad Team) कल्याण रोडवरील साईबाबा चेकपोस्ट येथे वाहन तपासणी



मोहीमेत एका वाहनातून सुमारे चार लाख 40 हजार रुपयांची रोकड रक्कम जप्त करून पोलीस ठाण्यात नोंद करून सदर रक्कम महापालिकेच्या लेखा विभागात जमा केल्याची माहिती पालिका आयुक्त प्रशासनाकडून देण्यात आली.

भिवंडी शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक होणार असल्याने भाजप, शिवसेना, काँग्रेस,समाजवादी पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस,कोनार्क विकास आघाडी सह विविध पक्ष व अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात दाखल करून प्रचार यंत्रणा सुरू केली आहे.त्यामुळे पोलीस यंत्रणा, महापालिका निवडणूक विभाग कर्मचारी व अधिकारी सतर्कपणे सर्व हालचाली वर लक्ष केंद्रित करून कामकाज करीत आहेत.शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने ती भंग होऊ नये यासाठी सुद्धा विशेष काळजी घेतली जात आहे. शहरातील विविध ठिकाणी मुख्य प्रवेशद्वारावर येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची पोलीस व आचारसंहिता पथकाचे अधिकारी तपासणी करत आहेत असे असताना भिवंडी कल्याण रोडवरील साईबाबा चेकपोस्ट येथे काल सायंकाळी आचारसंहिता पथकाचे प्रमुख तथा मनपा चे अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक एक चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहन तपासणी दरम्यान चारचाकी वाहन मारुती इर्टीगा (क्रमांक MH-05-EV-666) या वाहनातून रु. चार लाख 40 हजार रुपये रोख रक्कम जप्त केली. वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे सदरची रक्कम कुठून आणली व कुठे चालली व काय कामासाठी रक्कम घेतली आहे याबाबतची चौकशी करून संबंधित कागदपत्रांची मागणी केली असता सदरील वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे एफएसटी पथकास दाखवू शकले नाहीत त्यामुळे पथक प्रमुख यांनी पैशाची मोजणी करून त्याबाबत पंचनामा करून सदरची रक्कम रुपये 4लाख 40 हजार रुपये इतकी रोख पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम महापालिकेच्या लेखा विभागात जमा करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.सदर कारवाईवेळी यशस्वी करण्यासाठी प्रभाग अधिकारी पथका प्रमुख माणिक जाधव.धनराज पाटील व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

# ठाण्याची हवा बिघडल्याने रुग्ण वाढले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : मुंबईतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक १३० वर पोहोचलेला असतानाच ठाणे शहरातील हवा प्रदूषणाची स्थिती अधिक गंभीर आहे. मंगळवारी ठाणे महापालिका हद्दीत हवेचा गुणवत्ता निर्देशांक १४४ इतका नोंदविला गेला. सध्या ठाणे शहरातील हवा पिवळया अर्थात मध्यम प्रदूषित गटात मोडत आहे. विशेषतः घोडबंदर परिसरात सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणावरील विकासकामांमुळे धुळीचे प्रदूषण वाढले आहे. दोन आठवड्यांपासून ठाणे शहरातील विविध खासगी दवाखान्यांमध्ये दररोज ५० ते ६० रुग्ण सर्दी, खोकला व तापाच्या तक्रारी घेऊन उपचारासाठी येत असल्याची माहिती समोर आली आहे. कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तसेच ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



शनिवार
०३ जानेवारी २०२६

**मेष**
तुम्ही वाहन किंवा घर खरेदी करू शकाल. सामाजिक किंवा व्यावसायिक जीवनात जवळच्या मित्रांकडून मदत मिळेल, त्यामुळे अडचणी कमी होतील.

**वृषभ**
उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. नोकरी करणाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून कामाच्या ठिकाणी सन्मानित केले जाऊ शकते.

**मिथुन**
तुम्ही व्यस्त राहाल. बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील लोकांना काही अडचणींना सामोरे जावे लागू शकते. मुलांच्या शिक्षणासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कर्क**
खाजगी क्षेत्रात काम करत असाल किंवा व्यावसायिक असाल, या वर्षी तुम्ही लांब पल्ल्याच्या सहलीला जाण्याची शक्यता आहे. ही सहल फायदेशीर ठरेल.

**सिंह**
कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या कामांवरून संघर्ष उद्भवू शकतात, परंतु तुम्ही चातुर्याचा वापर करून तो प्रश्न सोडवाल. आर्थिकदृष्ट्या वर्ष छान राहील.

**कन्या**
नोकरी असो वा व्यवसाय, तुम्ही जे काही करण्याचा विचार करत आहात ते यशस्वी व्हाल. तुम्ही ज्याची वाट पहात होतात. बदलीची सूचना मिळू शकते.

**तुळ**
खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रगतीचा मार्ग गवसेल. तुमची प्रतिष्ठा वाढेल. या वर्षी व्यवसाय करणाऱ्यांची भरभराट होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**
तुम्ही तुमची बहुतेक कामे यशस्वीरित्या पूर्ण कराल. तुमचे प्रेमसंबंध अधिक दृढ होतील आणि तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत उत्तम वेळ घालवाल.

**धनु**
हे वर्ष सकारात्मक परिणाम घेऊन येईल. तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. आरोग्याच्या समस्या दूर होतील. तुमच्या कामाच्या ठिकाणी तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**मकर**
नोकरी करणाऱ्यांना लक्षणीय फायदा मिळण्याची शक्यता आहे आणि जे स्वयंरोजगार करतात त्यांच्या व्यवसायात लक्षणीय बदल होण्याची शक्यता आहे.

**कुंभ**
अपेक्षित यश मिळविण्यासाठी तुम्ही तुमच्या वडिलांचा सल्ला आणि पाठिंबा घेऊ शकता. नोकरी करणारे प्रामाणिकपणे आणि परिश्रमपूर्वक काम करतील. नवीन

**मीन**
व्यक्तींशी गाठीभेटी होतील, ज्याचा तुमच्या व्यवसायाला फायदा होईल. नोकरी करणाऱ्यांना उत्तम यश मिळू शकते. आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

# निष्ठा, सेवा आणि संघर्षाचा चेहरा प्रशांत तुकाराम भामरे



राजकारण हे केवळ पद, तिकीट किंवा निवडणूक जिंकण्यापुरते मर्यादित नसून ते जनसेवा, निष्ठा आणि सातत्यपूर्ण संघर्षाचे माध्यम असते. अशाच निष्ठेचा, सेवाभावाचा आणि संघर्षशील नेतृत्वाचा एक ठळक चेहरा म्हणजे प्रशांत भामरे सर आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेबांचे व खासदार डॉक्टर श्रीकांतजी शिंदे साहेबांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून गेली 30 वर्ष प्रामाणिकपणे कार्य करत आलेले आहे प्रशांत भामरे सर यांची ओळख केवळ पक्षांतर्गतच नव्हे तर इतर सर्व पक्ष व सर्वसामान्य जनतेतही दृढपणे रुजलेली आहे. राजकारणाकडे संधी म्हणून नव्हे तर सेवेचे व्रत म्हणून पाहणाऱ्या या कार्यकर्त्याने गेली अनेक वर्षे कल्याण शहरात अखंडपणे काम केले आहे.

**शिक्षकांसाठी व जनतेसाठी आधारवड**

प्रशांत भामरे सर हे शिवसेना विधानसभा समन्वयक म्हणून कार्यरत असून ते शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष व ठाणे/ पालघर जिल्हा विद्यासेवक पतपेढीचे संचालक म्हणून व महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन नियामक मंडळ सदस्य मुंबईचे सदस्य आणि शिक्षक नेते देखील आहेत ठाणे जिल्हा विद्या सेवक पतपेढी मधून सलग दोन वेळा सर्वाधिक मतांनी निवडून येणारे आवडते शिक्षक नेते आहेत या माध्यमातून त्यांनी हजारो गरजू रुग्णांना दिलासा दिला आहे. अपघात, गंभीर आजार, आर्थिक अडचणीत सापडलेले कुटुंब, महागड्या शस्त्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी मोफत व या पुस्तक वाटप गरजू विद्यार्थ्यांना मदत — अशा प्रत्येक प्रसंगी भामरे सर हे मदतीसाठी धावून गेले आहेत. अनेक शिक्षक व खानदेशी बांधवांना अडचणीत असताना राजकारण बाजूला ठेवून माणूस म्हणून मदत करणे हेच खरे शिवसैनिक" व खानदेश बांधव म्हणून काम करण्याची त्यांची कार्यपद्धती आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.

या सर्व माध्यमातून त्यांनी कल्याण पश्चिम मधून लोकांशी असलेला भावनिक दुवा अधिक घट्ट केला.

कार्यकर्त्यांशी आपुलकी, सामान्य नागरिकांशी संवाद आणि वरिष्ठ नेत्यांप्रती निष्ठा — या तिन्ही गोष्टींचा सुरेख समन्वय प्रशांत भामरे सर यांच्या कार्यशैलीत दिसून येतो खानदेश ची बुलंद तोफ व शिक्षकांचा आवाज अशी त्यांची ओळख आहे

**तिकीट न मिळालं, पण निष्ठा ढळली नाही.**

या वेळच्या महानगरपालिका निवडणुकीत सदर वार्ड हा भाजपला गेल्यामुळे आदरणीय एकनाथजी शिंदे साहेबांकडून त्यांना तिकीट मिळाले नाही, ही बाब अनेक कार्यकर्त्यांसाठी निराशाजनक ठरू शकली असती. मात्र प्रशांत भामरे सर यांनी या परिस्थितीकडे संधी म्हणून पाहिले.

पक्ष, नेतृत्व आणि विचारधारेशी निष्ठा कायम ठेवत त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला नाही "पद किंवा तिकीट हे क्षणिक असते, पण जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची साथ ही खरी ताकद आहे" हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

**जनतेतून उमटलेला विश्वास**

ते नेत्यांपेक्षा कार्यकर्ते म्हणून अधिक ओळखले जातात आणि हीच ओळख त्यांच्या राजकारणाची खरी ताकद आहे.

**भविष्यासाठी आश्वासक नेतृत्व**

प्रशांत भामरे सर यांचा हा संघर्ष केवळ एका निवडणुकीपुरता मर्यादित नाही, तर तो नव्या पिढीतील निष्ठावंत, सेवाभावी आणि जमिनीवर काम करणाऱ्या नेतृत्वाचा संदेश देणारा आहे.तिकीट असो वा नसो, सत्ता असो वा नसो — सेवा थांबत नाही ही भूमिका त्यांनी ठामपणे मांडली आहे. त्यामुळेच आज ते केवळ शिवसेना विधानसभा समन्वयक व शिक्षक नेते नसून, जनतेचा व तमाम खानदेशी बांधव व शिक्षकांचा आवाज बनले आहेत. प्रशांत भामरे सर यांच्या नशिबात पुढे नक्कीच काहीतरी चांगलं लिहिले आहे असं समजून ते एकनाथजी शिंदे साहेब व खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब यांचे निष्ठावंत म्हणून कार्य करत राहतील

(कल्याण पश्चिम मधील सर्व खानदेशी बांधव व शिक्षकांच्या हृदयातून निघालेला आवाज आपल्यापर्यंत पोहचवीत आहे)

**आपलाच**
**अनंत किनगे सर**
**विलास जाधव सर**
**व तमाम शिक्षक व खान्देशी बांधव कल्याण पश्चिम**

# पडघा आठवडा बाजारात वाहन प्रवेशबंदीची नागरिकांची मागणी



## पडघा ग्रामपंचायत, पोलिसांचे दुर्लक्ष

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील गर्दीचा उच्चांक मोडणाऱ्या रविवारच्या आठवडा बाजारात विविध वाहनांना प्रवेश बंदी करण्याची मागणी नांगरीकानी केली आहे.

पडघा येथील रविवारचा सर्वात मोठा आठवडा बाजार भरत असुन या बाजारात विविध प्रकारची सुकी मच्छी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्याने खास सुकी मच्छीसाठी हा बाजार प्रसिद्ध आहे. मच्छीसोबत या बाजारात कांदे, बटाटे, लसुण, भाजीपाला, घरगुती साहीत्य, मसाल्याचे पदार्थ, फळे, ओली मच्छी, जिवनावश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी उपलब्ध होत असल्याने सकाळी 9 ते रात्री 8 पर्यंत खरेदीसाठी नागरीकांची या बाजारात तुंडुब गर्दी असते पडघ्यातील गणपती मंदिर ते ते शहापुर बाजुकडील प्रवेशद्वारापर्यंत मुख्य रस्त्यालगत दोन्ही बाजूला विविध विक्रेते आपली दुकाने थाटत असल्याने नागरीकांना चालण्यासाठी अरूंद रस्ता असतो त्यात या रस्त्यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने चारचाकी दुचाकी वाहने थेट आठवडा बाजारात गर्दीत येत असल्याने खरेदीसाठी आलेल्या नागरीक, महीला, वृद्धांना खुप त्रास सहन करावा लागत आहे तसेच गर्दीत आलेल्या वाहनांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे पडघा ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाने संयुक्त विद्यमाने योग्य नियोजन करून वाहनांवर बंदी आणावी तसेच आठवडा बाजारात येण्यासाठी असलेल्या उपरस्त्यांवर नाकाबंदी करावी अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.



**डोंबिवली : निळजे कोळे मनसे पुरस्कृत अपक्ष नगरसेवक प्रभाकर जाधव ह्यांचा आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे साहेब ह्यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश**

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

### मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्धीची जाहीर सूचना :-

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.१३/११/२०२५ व २६/११/२०२५ अन्वये दिलेल्या सुधारीत मतदार यादीच्या कार्यक्रमानुसार दिनांक २०/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अंतिम मतदार याद्यांनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७ अ च्या तरतुदीनुसार ३१ निवडणूक प्रभागांच्या मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या दिनांक ०३/०१/२०२६ रोजी खालील नमुद निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | बिर्ला वन्य, केडीएमटी इमारत, तळ मजला, शहाड, कल्याण-मुरबाड रोड, साई निरवाना, इमारती जवळ, शहाड (प.) | २, ३, ४ |
| २ | '२/ब' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, संघवी इस्टेट, बारावे रोड, कल्याण पश्चिम. | १, ५, ६, १० |
| ३ | '३/क' प्रभाग क्षेत्र कार्यालय, अग्नीशमन केंद्राजवळ आधारवाडी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण पश्चिम. | ७, ८, ९ |
| ४ | '४/जे' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका. भगवती अभिलाषा कन्व्हेंचर, धनलक्ष्मी अपार्टमेंट जवळ, लोकग्राम रेल्वे टिकीट काऊंटर समोर, लोकग्राम, कल्याण (पुर्व). | ११, १२, १८ |
| ५ | '५/ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग कार्यालय), पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण पूर्व. | १३, १४, १५,१६ |
| ६ | '६/फ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पीपी चेंबर, भगतसिंग रोड, डोंबिवली पूर्व | २०, २६, २७,२८ |
| ७ | '७/ह' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रेतीबंदर रोड, उमेश नगर, २ पाण्याच्या टाकी जवळ, डोंबिवली पश्चिम. | २१, २२, २३, २५ |
| ८ | '८/ग' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सुनिल नगर, डिएनसी रोड, बहिणाबाई उद्यानाच्या मागे, डोंबिवली पूर्व. | २४, २९,३० |
| ९ | जलतरण तलाव येथील कार्यालय, ह.भ.प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व. | १७,१९,३१ |

तसेच ३१ निवडणूक प्रभागांच्या मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या ह्या निवडणूक विभाग मुख्यालय, महापालिका भवन, तळमजला, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**ठिकाणः कल्याण**
**दिनांकः ०२/०१/२०२६**

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/मुका/८२५**
**दिनांक : ०२/०१/२०२६**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

# प्रभागातील प्रलंबित नागरी समस्या सोडविण्यासाठी नगरसेविका कलावती पाटील यांचे निवेदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजप–राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला घवघवीत यश मिळाल्यानंतर प्रभाग क्रमांक एकमधून निवडून आलेल्या भाजपच्या नगरसेविका कलावती पाटील यांनी प्रभागातील नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी कामाला सुरुवात केली आहे.

प्रभागातील मूलभूत नागरी सुविधा सोडविण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगत पेण नगरपालिकेत निवेदन सादर केले. कुंभार आळी, नंदिमाळ नाका, परीट आळी, तरे आळी, प्रभू आळी आदी भागांतील शौचालयांची दुरवस्था, सांडपाणी नाले व गटारांची साफसफाई, औषध फवारणी, खराब रस्त्यांची दुरुस्ती, मंजूर रस्त्यांची उभारणी, पाणीपुरवठा, बंद पथदिवे सुरू करणे तसेच महत्त्वाच्या चौकांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

निवेदन स्वीकारल्यानंतर मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी समस्यांचा आढावा घेऊन टप्प्याटप्प्याने त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



**नगरसेविका कलावती पाटील यांनी सदर केलेल्या निवेदनानुसार ज्या ज्या विभागाशी निगडित समस्या आहेत त्या विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून नागरिकांच्या समस्या सोडविल्या जातील. प्रभाग क्रमांक एक मधील काही रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले आहे. उर्वरित काम लवकरच सुरू करण्यात येईल. यांसह स्वच्छता, साफसफाई यांकडे विशेष लक्ष देऊन निवेदनात मांडलेल्या समस्या देखील जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे सोडविल्या जातील.**
**- जीवन पाटील, मुख्याधिकारी पेण नगर परिषद**

**निवडणूक प्रचारादरम्यान प्रभागात फिरत असताना नागरिकांनी अनेक महत्वाच्या समस्या माझ्यासमोर कथन केल्या होत्या, त्यांच्या या समस्या सोडविणे हे माझे प्रथम कर्तव्य असून त्या समस्यांबाबत मी पेण पालिकेमध्ये निवेदन सादर केले आहे. पालिकेतील पदभार स्वीकारल्यानंतर मान्यवरांच्या आदेशानुसार आणि नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या सूचनेनुसार मी माझ्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य देणार आहे.**
**- कलावती पाटील**
**नगरसेविका पेण न. पा.**

# माजी नगरसेवक विजय काटकर यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

## आर्थिक देवाण-घेवाण मधून प्रवेश झाल्याचा उपशहर प्रमुख सुरेश सोनार यांचा आरोप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मुलीला उमेदवारी न मिळाल्याचे कारण देत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख विजय काटकर यांनी शिंदे गटात प्रवेश केला असून हा प्रवेश आर्थिक देवाणघेवाण मधून झाल्याचा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच उपशहर प्रमुख सुरेश सोनार यांनी केला आहे. तसेच उपनेते विजय बंड्या साळवी यांच्यावर केलेले सर्व आरोप खोटे असल्याचे सोनार यांनी सांगितले आहे.

गुरुवारी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना उपशहर प्रमुख विजय काटकर यांनी शिवसेना उपनेते विजय साळवी यांनी आर्थिक देवाण-घेवाण करून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील उमेदवार निश्चित केले असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्यामुळेच माझ्या मुलीला उमेदवारी मिळाली नाही असा आरोप केला होता.



याचे उपशहर प्रमुख सुरेश सोनार यांनी खंडन केले असून पॅनल क्रमांक चार मधील उमेदवार केवळ त्यांच्या निवडून येण्याच्या निकषावरच त्यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. यामधील बल्याणी विभागातील उंभरणी गावचे अनुसूचित जातीचे तेजश्री हेमंत गायकवाड यांना उमेदवारी देण्यात आली. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक फोडाफोडीच्या राजकारणात उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेना या पक्षावर निष्ठा ठेवून पक्षासोबत राहिलेले दया शेट्टी यांच्या पत्नी रूपा शेट्टी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

तसेच शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या एकत्र असून मनसेचे राहुल कोट यांना उमेदवारी देण्यात आली असून विभाग प्रमुख लक्ष्मण तरे आणि उप विभाग प्रमुख शत्रुघ्न तरे यांचे बंधू राम तरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. केवळ निवडून येण्याचा निकष पाहण्यात आला असून यात कोणत्याही प्रकारची आर्थिक देवाण-घेवाण झाली नसल्याचे उपशहर प्रमुख सुरेश सोनार यांनी सांगितले.

ऐन निवडणुकीच्या काळात माजी नगरसेवक विजय काटकर यांनी घेतलेला निर्णय दुर्दैवी असून पक्षाने त्यांना नगरसेवक सभापती केले असून अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली आहेत त्यांनी कोणत्याही पक्षात जावे परंतु आपल्याला ज्या पक्षाने मोठे केले आहे त्या पक्षावर अशा पद्धतीने टीका करणे चुकीचे आहे असे सोनार यांनी सांगितले आहे. यावेळी विभाग प्रमुख लक्ष्मण तरे, उपविभाग प्रमुख अजय पाटील विभाग प्रमुख विजय कोट उपविभाग प्रमुख शत्रुघ्न तरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# "प्रा. मधुकर देशमुख यांना 'कृषीरत्न डॉ. पंजाबराव देशमुख' पुरस्कार"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील पिवळी येथील एस.जी.शिक्षण मंडळाचे संस्थापक, प्राध्यापक मधुकर शांताराम देशमुख यांना लोक विद्यापीठाच्या कृषीरत्न डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवरत यांचे मिशन किमान दहा गुंठे तरी आरोग्यासाठी नैसर्गिक शेती करा हा महत्वपूर्ण विचार लक्षात घेता देशमुख यांनी आपल्याकडे असलेल्या शेवंताबाई विद्यालय व किल्ले माऊली कनिष्ठ महाविद्यालय येथे शिकत असलेल्या 650 विद्यार्थ्यांच्या योगदानातून कर्मवीर भाऊराव पाटील सातारा यांचे



कमवा आणि शिका या शिक्षणाच्या पद्धतीचा योग्य उपयोग करून शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नैसर्गिक शेती करण्याचा उपक्रम सुरू केलेला आहे.

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून नैसर्गिक शेतीचे धडे दिले जात आहेत. तसेच आज भारतात अनेक व्यक्ती या हृदयविकार, किडनी कॅन्सर, गुडघेदुखी, संधिवात, थायराइड, मधुमेह, ब्लड प्रेशर, लकवा इत्यादी आजार उद्भवत आहेत असे गंभीर आजार लक्षात घेता त्यांनी डॉ. प्रशांत मुळीक, मुंबई यांच्याशी समन्वय साधून आपल्या पिवळी येथे कृषी निसर्गोपचार थेरपी केंद्र सुरू केलेले आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण दोन्ही उपक्रमाला त्यांच्या शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक आण कर्मचारी यांचे योगदान मिळत आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मधूकर देशमुख यांना दि.रविवार 4 जानेवारी 026 रोजी ऐरोली येथे आयोजित कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

# निर्मल इंग्लिश मीडियम शाळेत योगाने नववर्षाची सुरुवात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली** : जीवनदीप महाविद्यालय गोवेली च्या ज्ञानसंकुलातअसलेले निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल येथे शुक्रवार दिनांक ०२- ०१- २०२६ रोजी नववर्षाचे स्वागत हे योगा करून करण्यात आले. निर्मल इंग्लिश स्कूल मधील लहान मुलांपासून ते इयत्ता दहावी पर्यंतच्या सर्वच मुलं, मुलींनी या योगा कार्यक्रमात सहभाग घेऊन योगाचे धडे गिरवले. आरोग्य योगा अँड नॅचरोपॅथी, जीवनदीप शैक्षणिक संस्था, निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने संकल्प सिद्धी हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात मुलांना योगाचे धडे देण्यात आले, मानवी कृतीतून होणारे पर्यावरणात बदल याविषयी माहिती तसेच प्रदूषणाबाबत जागरूकता करण्यात आली. अनुलोम-विलोम, ताडासन, सूर्यनमस्कार, इत्यादी योगा प्रकार विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. आरोग्य योगा अँड नॅचरोपॅथी चे सर्वे सर्व डॉ.विजय कुकरेजा व समन्वयक स्नेहल पाटील, डॉक्टर रेणुका बिरादर, प्रियंका मॅडम यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करीत योगा करून घेतला. सदर कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे,संचालक. प्रशांत घोडविंदे,निर्मल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका. भावना कुंभार, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे यांचे मार्गदर्शन लाभले.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत सर्वांनी उज्वल भवितव्याच्या हेतूने पर्यावरण पूरक व स्वतःचा विकास घडवू अशी प्रतिज्ञा घेतली. समन्वय स्नेहल पाटील यांनी आभार व्यक्त करीत कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर केले.





ठाणे ■ शनिवार

०३ जानेवारी २०२६

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पान ४


# शैक्षणिक साहित्य निर्मिती राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांचे वतीने राज्यातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे औचित्य साधून नोव्हेंबर मध्ये गटस्तरावर जवळपास 50 स्पर्धांचे, डिसेंबर मध्ये विभागीय स्पर्धांचे आयोजन व त्यानंतर माहे जानेवारीमध्ये राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धा अंतर्गत शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजन करण्याची जबाबदारी ठाणे जिल्ह्यावर असून सदरची स्पर्धा दिनांक 3 जानेवारी 2026 रोजी पीएम श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज विद्यालय, आंबेडकर नगर, रबाळा नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ शैक्षणिक विभागातील प्रत्येक विभागातील प्रत्येकी पाच याप्रमाणे एकूण 40 स्पर्धक शिक्षक व अधिकारी कर्मचारी सहभागी होत आहे. सदरच्या राज्यस्तरीय स्पर्धेतून 10 स्पर्धकांनी निवड करण्यात येणार आहे. सदर स्पर्धकांना एससीआरटीच्या वतीने गौरव करण्यात येणार आहे. हे शैक्षणिक साहित्य बघण्याची संधी ठाणे जिल्ह्यातील तसेच मुंबई व रायगड जिल्ह्यातील शिक्षकांना उपलब्ध होणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत असणार आहे. तरी शिक्षकांनी राज्यातील या उत्कृष्ट तज्ञ शिक्षकांनी बनवलेल्या शैक्षणिक साहित्यात बघण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन ठाण्याचे प्राचार्य डॉक्टर संजय वाघ यांनी केले आहे

# कृषी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत 'कृषी महोत्सव' कार्यक्रमाचे आयोजन म्हसा येथे करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील म्हसा येथे दि.4 जानेवारी 2026 रोजी हा कृषी महोत्सव पार पडणार असून शेतकरी व ग्राहक यांच्यात थेट संवाद व विक्री व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या कृषी महोत्सवामध्ये कृषी प्रदर्शने हा महत्त्वाचा घटक असून यामध्ये शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले श्री अन्न (मिलेट्स), फळे, फुले, भाजीपाला, कडधान्ये तसेच अन्न प्रक्रिया केलेले विविध पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

याशिवाय कृषी विषयक माहिती, मार्गदर्शन व अनुभवांची देवाण-घेवाण करण्यासाठी कृषी व कृषी संलग्न विभागांचा सक्रीय सहभाग राहणार आहे. उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीसाठी स्वतंत्र दालने- ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित व प्रक्रिया केलेल्या दर्जेदार शेतमालाची विक्री साखळी विकसित करण्याच्या उद्देशाने उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीसाठी स्वतंत्र दालने उभारण्यात आली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास योग्य दर मिळण्यास मदत होणार असून ग्राहकांना ताज्या व दर्जेदार मालाची थेट खरेदी करता येणार आहे.

तसेच शेतकरी ते ग्राहक थेट विक्री साखळीचा विकास कृषी विषयक, आधुनिक तंत्रज्ञान व शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, शेतकरी व ग्राहक यांच्यात थेट संपर्क प्रस्थापित करणे तसेच शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे या उद्देशाने हा कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य भाव आणि ग्राहकांना उच्च दर्जाचा माल मिळावा यासाठी शेतकरी ते ग्राहक थेट विक्री साखळी विकसित करण्यावर भर देण्यात आलेला असल्याचे कृषी विभागाने म्हटले आहे.

दरम्यान, कृषी विषयक माहिती व मार्गदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेणे, स्थानिक कृषी उत्पादनांना चालना देणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जागृती निर्माण करणे हा कृषी महोत्सव कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून ठाणे जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी तसेच म्हसा यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांनी व यात्रेकरूनी या कृषी महोत्सव कार्यक्रमास आवर्जून भेट द्यावी असे आवाहन कृषी विभागा मार्फत करण्यात आले आहे.

# निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (01)** : सर्वच महानगरपालिकांच्या निवडणुका एकाच दिवशी होत असल्याने निवडणूक कर्तव्यावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी टपाली मतदानाची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुंबईसह ठाणे महानगरपालिका हद्दीत कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांची नावे ते वास्तव्यास असलेल्या मुंबई, डोंबिवली, कल्याण, बदलापूर नेरूळ, पनवेल अशा विविध ठिकाणच्या मतदार यादीत नोंदलेली आहेत. हे सर्व कर्मचारी मतदार असून सार्वत्रिक महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांची निवडणूक कामी नेमणूक करण्यात आली आहे. निवडणूक कर्तव्यामुळे मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाने टपाली मतदानाची व्यवस्था केली आहे. सध्या राज्यातील विविध महानगरपालिकांच्या निवडणुका



एकाच कालावधीत जाहीर झाल्याने अनेक कर्मचाऱ्यांचे मतदान अन्य महानगरपालिका क्षेत्रात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा किंबहुना मतदान करणे सुलभ व्हावे यासाठी टपाली मतदानाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून या कामी उपायुक्त दिनेश तायडे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक ड्युटीवर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकेच्या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपला मतदानाचा हक्क वाया जाऊ देऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यासाठी सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना निवडणूक आदेशासोबत टपाली मतपत्रिका मिळविण्यासाठी आवश्यक नमुने उपलब्ध करून दिले आहेत.

संबंधित कर्मचाऱ्यांनी टपाली मतपत्रिकेसाठीचा नमुना भरून, त्यासोबत संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत नाव असल्याचा पुरावा तसेच निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती आदेशाची प्रत सादर केल्यास टपाली मतपत्रिका थेट त्यांच्या घरी पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे निवडणूक ड्युटीमुळे मतदानापासून वंचित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता सहजपणे आपला मतदानाचा अधिकार बजावता येणार आहे.

# 33 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर मुख्याध्यापक मधु मोरे सेवानिवृत्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : तेहतीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या खवली येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मधु विठोबा मोरे यांचा नियत वयोमानानुसार ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवापूर्ती व सेवागौरव समारंभ संपन्न झाला.

माजी मुख्याध्यापक पी एल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या सेवापुर्ती कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे ग.बा.वडेर हायस्कूलचे प्राचार्य घोडके सर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दादरचे प्राचार्य डी.एस.पाटील ,माजी मुख्याध्यापक बी डी गायकवाड, खवली केंद्राचे केंद्रीय प्रमुख बैकर साहेब बांठीया महाविद्यालयाचे उपप्राचार्य अशोक आंबरे अरविंद आहेर रवींद्र आहेर सुनील





आहेर अंकुश आहेर ,देवराम आहेर चंद्रभान कानवडे टेमकर सर कुंभार सर, सौ. जे. पी. पाटील श्री. ठाकूर सर, सौ .विद्या घरत , पत्रकार धनाजी घरत ,शाळा समिती खवलीचे अध्यक्ष श्री. यादव साहेब, श्री. वाघमारे साहेब, भैरव गावचे सरपंच दीपक पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन आणि स्वागत गीताने करण्यात आली. विद्येची देवता सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करून श्रीफळ वाढवण्यात आला. सौ दीक्षा पवार यांनी मुख्याध्यापक तथा सेवापुर्ती मोरे सर यांच्या कार्याचा चढता आलेख सादर करून वर्षभरात केलेल्या कामाची व शैक्षणिक कार्याची माहिती सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले. अनेक मान्यवरांनी मोरे सरांच्या शैक्षणिक कार्याचा तसेच त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्य सेवेबद्दल शाळा विद्यार्थी व शिक्षक संस्था यांना केलेले सहकार्य व शैक्षणिक क्षेत्रात केलेले अतुलनीय कार्याची माहिती देताना अनेकांना अश्रू आवरता आले नाही.

१७ जून १९९२ ते ३१ डिसेंबर २०२५ या ३३ वर्षाच्या कालावधीत मोरे सरांनी ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय सावळा रसायनी जांभुळपाडा पेण दादर कळंबोली ,खवलीआदी ठिकाणी विविध उपक्रमांनी शाळेच्या लौकीकास भर घातली.शालेय शिस्त आत्मसात करून आपुलकी नेतृत्व अध्यापन कौशल्य सहकार्य,शिक्षक वृत्तीने सेवेत सामावून घेतले. इंग्रजी विषयांवर प्रभुत्व मिळवत शेवटच्या क्षणापर्यंत इंग्रजी विषय शिकवत अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थ्यांना ज्ञानामृत दिले.

अविरत मेहनत आणि उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल माध्यमिक विभाग खवली केंद्र यांचे तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मधू मोरे यांना केंद्रप्रमुख बैकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी श्री .मोरे सर यांचे आप्तेष्ट नातेवाईक व सर्व कुटुंबीय मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी सुधागड एज्युकेशन सोसायटी यांच्याकडून सन्मानपत्र व सन्मानचिन्ह संस्थेचे मुख्याध्यापक घोडके सर यांच्या हस्ते देण्यात आले. तसेच विद्यालयातर्फे सन्मानचिन्ह व मानपत्र देण्यात आले. सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षा सौ.गीताताई पालरेचा यांनी फोन द्वारे शुभेच्छा संदेश दिला. खवली शाळेचे सेवाज्येष्ठ शिक्षक डुबे सरांनी उत्तम सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समीर पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खवली विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# ठाण्यात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : श्री संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळाचे वतीने श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ महाराज यांचे पुण्यतिथी निमित्ताने दि.04 जानेवारी ते 11 जानेवारी 2026 रोजी आईमाता मंदिर, मिनाताई ठाकरे गार्डनच्या बाजुला, कोरस रोड, सावरकर नगर, ठाणे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाचा शुभारंभ सकाळी १०.०० वाजता घट स्थापना यशवंतराव तिडके, ज्ञानेश्वरी पुजन सहा. सिद्धिविनायक ट्रस्ट विश्वस्त सुदर्शन सांगळे, विणा पुजन मा.नगरसेविका राधा जाधवर आणि ध्वजपुजन अनंत वायभासे यांचे हस्ते करण्यात आला.

या अखंड हरिणाम सप्ताहामध्ये पहाटे 4 ते 6 वा. काकड आरती, 6 ते 7 वा. विष्णुसहस्त्रनाम, सकाळी 7 ते10 वा. श्री ज्ञानेश्वरी पारायण, 10 ते 12 वा. गाथा भजन, दु.12 ते 2 वा. भोजन विश्रांती 2 ते 4 वा. महिला भजन, सायं. 5 ते 6 वा. हरिपाठ आणि रात्री 8 ते 10 वा. महाराष्ट्रातील थोर नामांकित किर्तनकारांचे हरि किर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. तसेच दि.11 जानेवारी रोजी 2026 रोजी सकाळी 10 ते 12 या वेळात श्री क्षेत्र भगवानगडाचे ह.भ.प. महेंद्र महाराज मळेकर यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होणार आहे. नंतर दिंडी मिरवणुक, आरती व महाप्रसाद होईल. तरी परिसरातील वारकरी संप्रदायातील भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळाचे अध्यक्ष शाशिकांत दौंड, उपाध्यक्ष बाबासाहेब वाघ, कार्याध्यक्ष रावसाहेब गर्कळ, उपकार्याध्यक्ष शिवाजी जायभाये यांनी केले आहे.

# महात्मा गांधी विद्यालय धसई येथे आनंद मेळावा!

## विद्यार्थ्यांना व्यावहारिक व व्यावसायिक ज्ञानाची शिदोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : शालेय अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना बाह्य जगातील व्यवहार, उद्योग आणि स्वावलंबनाचे धडे मिळावेत, या उद्देशाने मुरबाड तालुक्यातील जनसेवा शिक्षण मंडळ संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धसई येथे 'आनंद मेळावा' उत्साहात पार पडला. वर्षाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शालेय ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून व्यावहारिक व व्यावसायिक ज्ञान मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी



स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. शाबुदाणा वडा, भेळ, कबाब, दहीवडा, इडली-सांबार, मसाला डोसा, कांदा भजी, भुजिंग, शेवभजी, मुगभजी, पाणीपुरी, कटलेस, वडापाव, अंडा पाव, पोळी-भाकरी अशा अनेक पदार्थांची विक्री करण्यात आली. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी चुलीवरच पदार्थ तयार करून विक्री केल्याने मेळाव्याला विशेष रंगत आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास व आनंद लक्षवेधी ठरला. या उपक्रमातून खरेदी-विक्री व्यवहार, खर्च-उत्पन्नाचा हिशोब, नफा-तोटा, ग्राहकांशी संवाद, नियोजन व संघभावना यांचे प्रत्यक्ष धडे विद्यार्थ्यांना मिळाले. विशेषतः इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी स्टॉल व्यवस्थापनात पुढाकार घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आनंद मेळाव्याच्या निमित्ताने विविध गुणदर्शन व बौद्धिक स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. 'चालता-बोलता' कार्यक्रमात सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नोत्तरांचा समावेश करण्यात आला. याशिवाय रांगोळी, निबंध, वक्तृत्व, फॅन्सी ड्रेस, नृत्य व समूह नृत्य अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष सुरोशे यांच्या संकल्पनेतून बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक शरद धनराळे, अनंत भोंडीवले, उमेश सोलशे, नरेश पडवळ, सुधाकर वाघ, अनिल पाटील, संजय वारघडे, हनुमंत पारधी, जैतून शेख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आनंद मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच जीवनोपयोगी कौशल्यांची मौल्यवान शिदोरी मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

> **"घरगुती पदार्थांची विक्री करून नफा-तोट्याची संकल्पना विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात समजावी, व्यवसायाचे महत्त्व कळावे आणि पुढील आयुष्यात त्याचा उपयोग व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे,"**
> **- संतोष सुरोशे,प्राचार्य**







# जीवनदीपचे 17 कॅडेट YAMS शिबिरात सहभागी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

NCC YAMS या शिबिराचा मुख्य हेतू म्हणजेच आपत्ती प्रतिसाद आणि सामुदायिक सेवेसाठी प्रशिक्षित युवा गट तयार करणे आहे. या प्रशिक्षणाचे मुख्य लक्ष वैद्यकीय बेसिक लाइफ सपोर्ट सी पी आर ट्रॉमा केअर इ. गोष्टींबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे. युवा आपदा मित्र योजना YAMS या कॅम्प अंतर्गत 233 कॅडेट नी सहभाग घेतला हे सात दिवसीय निवासी शिबिर ऐरोली ( मुंबई )येथे पार पडण्यात आले. या शिबिरामध्ये जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथील 17 कॅडेट नी सहभाग नोंदवला. 3 MAH BH NCC यांच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जीवनदीप संस्थेचे अध्यक्षः रविंद्र घोडविंदे, संचालकः प्रशांत घोडविंदे, प्राचार्यः डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्यः प्रा .हरेंद्र सोष्टे , NCC विभागप्रमुखः प्रा .प्रविण भालेराव यामध्ये NDRF टीम च्या सहकार्याने कॅडेट्स ना आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रात्यक्षिके देण्यात आली. शिबिरादरम्यान गाठ बांधणे, जखमी व्यक्तींना उचलून नेण्याची योग्य पद्धती इत्यादी गोष्टी शिकवण्यात आल्या या प्रशिक्षणामुळे युवकांमध्ये आपत्तीच्या काळात तत्परतेने मदत करण्याची क्षमता व आत्मविश्वास वाढीस लागला असून आपत्ती उद्भवल्यास त्यावर तात्काळ प्रतिसाद देण्याचा दृष्टिकोन अधिक बळकट झाला आहे.

# कळवा येथे स्वीप पथकामार्फत मतदार जनजागृती





दै. ठाणे जीवनदीप वार्ता /**ठाणे (01)** : मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो... मतदान हा संविधानाने दिलेला अधिकार असून या अधिकाराचे पालन प्रत्येकाने करुन येत्या 15 जानेवारी 2026 रोजी होत असलेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत मतदान करा अशी जनजागृती स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून कळवा येथे करण्यात आली.

ठाणे महापालिकेच्या शाळा क्र. 69, 70, 115 मध्ये स्वीप पथकाने मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थीदशेतच मुलांना मतदानाचे महत्व कळावे किंबहुना 18 वर्ष पूर्ण झाल्यावर मतदानाचा हक्क प्राप्त होतो याबाबतचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही मतदान करण्याबाबतची शपथ देण्यात आली.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांच्या सूचनेनुसार स्वीप उपक्रमाच्या नोडल अधिकारी मिताली संचेती यांच्या मार्गदर्शनानुसार कळवा विभागात जनजागृती मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत शाळा क्र. 69,70,115 चे सर्व विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी कळवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त ललिता जाधव यांनी देखील मतदानाचे महत्व उपस्थितांना पटवून दिले. चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती कळवा येथील ठा.म.पा शाळा क्र. 29 मध्ये विद्यार्थ्यांना चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून मतदानाची जनजागृती केली. व्होट फॉर ठाणे असा संदेश देणारी चित्रे विद्यार्थ्यांनी साकारली. मतदान जनजागृती विषयक जनजागृती करणारी चित्रे कल्पकतेने साकारली. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना मतदान करण्यास प्रवृत्त करण्याबाबतचे मार्गदर्शन स्वीपच्या पथकाने केली.








Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024